**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः20.10.2024** **वारः रविवार**

---

ठळक बातम्या.

- पंतप्रधान नरेंद्र मोदी आज वाराणसी दौऱ्यावर. सहा हजार कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी करणार.
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू अल्जिरिया, मॉरिटॅनिया आणि मालावी या देशांचा दौरा पूर्ण करून मायदेशी परत.
- दिवाळी आणि छटपूजा या सणांसाठी प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेकडून 570 विशेष फेऱ्या जाहीर. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे आणि नागपूरसह विविध ठिकाणांहून विशेष रेल्वेंची व्यवस्था.
- आपल्या निवासस्थानी हल्ल्याचा प्रयत्न ही हेझबोलाची फार मोठी चूक असल्याचा इस्त्राईलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांचा इशारा.
- आणि
- बंगळुरु इथं सुरू असलेल्या कसोटी क्रिकेट सामन्यात न्यूझिलंड आज दुसऱ्या डावाची सुरुवात करणार. विजयासाठी न्यूझिलंडला केवळ 107 धावांची गरज.

**पंतप्रधान वाराणसी दौरा**

पंतप्रधान नरेंद मोदी आज वाराणसी मतदारसंघाला भेट देणार आहेत. एकंदर सहा हजार एकशे कोटी रुपयांच्या प्रकल्पांचं लोकार्पण आणि उद्घाटन पंतप्रधान या दौऱ्यात करणार आहेत. पंतप्रधान आज दुपारी दोन वाजता वाराणसीला पोचतील आणि आर. जे. शंकर नेत्र रुग्णालयाचं उद्घाटन करतील. त्यानंतर ते दुपारी साडेचार वाजता वाराणसीतील सिगरा स्टेडियम इथं विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करणार आहेत. वाराणसीच्या लालबहाद्दूर शास्त्री आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीची आणि विस्तारीत धावपट्टीची पायाभरणी पंतप्रधानांच्या

हस्ते होणार आहे. यासाठी दोन हजार 870 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आग्रा, दरभंगा आणि बागडोगरा विमानतळांच्या नवीन नागरी केंद्रांची पायाभरणी पंतप्रधान दूरस्थ पद्धतीनं करणार आहेत. मध्य प्रदेशातील रेवा विमानतळ, अंबिकापूरचा मा महामाया विमानतळ आणि सारस्वा विमानतळ यांच्या नवीन टर्मिनल इमारतींचं उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं होणार आहे. खेलो इंडिया योजना आणि स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत 210 कोटी रुपये खर्चून पुनर्विकास करण्यात आलेल्या वाराणसी क्रीडासंकुलाचं उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

**राष्ट्रपती परत**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू अल्जिरिया, मॉरिटॅनिया आणि मालावी या देशांचा दौरा पूर्ण करून काल नवी दिल्लीत परतल्या आहेत. या तीनही देशांशी संबंधांचा नवा ऐतिहासिक अध्याय त्यांच्या दौऱ्यामुळे जोडला गेला आहे. भारताकडे जी-वीस परिषदेचं अध्यक्षपद असताना आफ्रिका संघ या संघटनेचा कायमस्वरूपी सदस्या बनल्यानंतरचा मुर्मू यांचा हा पहिलाच दौरा होता. या आठवडाभराच्या दौऱ्यात राष्ट्रपतींनी तीनही देशांच्या प्रमुखांबरोबर द्विपक्षीय बैठका घेतल्या आणि तिथल्या भारतीय नागरिकांशी संवाद साधला.

**रेल्वे विशेष फेऱ्या**

दिवाळी आणि छटपूजा या सणांसाठी उत्तर आणि पूर्वेकडच्या राज्यांकडे जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेनं 570 विशेष फेऱ्या जाहीर केल्या आहेत. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे आणि नागपूरसह विविध ठिकाणांहून या फेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. 132 फेऱ्या मुंबईहून, तर 146 फेऱ्या पुण्याहून निघणार आहेत. तर 108 फेऱ्या लातूर, सावंतवाडी, नागपूर, पुणे, कोल्हापूर, नांदेड आणि इतर ठिकाणी पोचणार आहेत. या रेल्वेंमध्ये वातानुकूलित, शयनयान आणि सर्वसाधारण डब्यांचा समावेश आहे. दक्षिणेकडच्या करीमनगर, कोचुवेली, काझिपेट आणि बेंगळुरूसाठी 84 फेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. अधिक माहिती आणि सविस्तर वेळापत्रक प्रवासी www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळावरून किंवा NTES ॲपच्या माध्यमातून जाणून घेऊ शकतील.

**धर्मेंद्र प्रधान दौरा**

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान आजपासून सात दिवसांच्या सिंगापूर आणि ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहेत. सिंगापूरमधल्या दोन दिवसांच्या भेटीत प्रधान भारतीय समुदायाच्या सदस्यांशी संवाद साधणार आहेत. ते उद्या सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वॉंग आणि उपपंतप्रधान गान किम यॉंग यांची भेट घेणार आहेत. ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यात धर्मेंद्र प्रधान त्या देशाचे शिक्षणमंत्री जॅसन क्लेअर यांची भेट घेणार आहेत. ऑस्ट्रेलिया आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषदेच्या उद्घाटन सत्रात ते सहभागी होणार आहेत.

**भाजपबायपोल**

आसाम, बिहार, छत्तीसगड, कर्नाटक, केरळ,मध्यप्रदेश, राजस्थान आणि पश्चिम बंगाल या राज्यांमधील विधानसभेच्या काही जागांसह केरळमधील एका लोकसभा मतदारसंघात होणाऱ्या आगामी पोटनिवडणुकांसाठी भारतीय जनता पार्टीनं आपल्या पक्षाच्या उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. केरळमधील वायनाड लोकसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी भाजपानं काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी वड्रा यांच्या विरोधात नव्या हरिदास यांना उमेदवारी दिली आहे.

**नेतान्याह**

इस्राईलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी आपली आणि आपल्या पत्नीची हत्या करण्याच्या झालेल्या कथित प्रयत्नांबद्दल समाज माध्यमावर प्रतिक्रिया व्यक्त करताना हा हल्ल्याचा प्रयत्न ही हेझबोलाची फार मोठी चूक असल्याचं म्हटलं आहे. या हल्ल्यामुळे आपण किंवा इस्राईलचं सरकार विचलित होणार नाही, इस्राईलच्या सुरक्षित भविष्यासाठी शत्रूविरुद्धचा आमचा लढा सुरूच राहील असंही नेतान्याहू यांनी या संदेशात म्हटलं आहे. तसंच इस्रायली नागरिकांना इजा पोहोचवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना त्याची जबर किंमत मोजावी लागेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. इस्राईलच्या उत्तर किनारपट्टीच्या सीझारेसा या भागात असलेल्या नेत्यानाहू यांच्या खासगी निवासस्थानावर लेबेनॉननं ड्रोन हल्ला केल्याचा आरोप आहे. मात्र या हल्ल्यावेळी नेतान्याहू आणि त्यांची पत्नी दोघेही घरामध्ये नसल्यानं कोणतीही जीवितहानी झाली नाही, असं नेतन्याहू यांच्या कार्यालयानं म्हटलं आहे.

**भारत-रशिया**

भारत -रशिया यांच्यातील व्यावसायिक संबंध बळकट करण्याच्यादृष्टीनं मॉस्कोतल्या भारतीय दूतावासानं रशियाच्या व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवर आणि ब्रिक्स व्यावसायिक मंचाच्या भारतीय प्रतिनिधींसाठी मेजवानीचं आयोजन केलं. यावेळी भारताचे रशियातील राजदूत विनय कुमार यांनी भारत आणि रशिया या दोन्ही देशांतील 80 हून अधिक अग्रणी उद्योजकांची भेट घेऊन त्यांच्याशी व्यापार आणि गुंतवणूकीच्या क्षमता तसंच धोरणात्मक भागीदारीच्या शक्यतांविषयी चर्चा केली

**रहाटकर-नियुक्ती**

भाजपच्या राष्ट्रीय सचिव, राजस्थान भाजपच्या सहप्रभारी विजया रहाटकर यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. विजया रहाटकर यांनी महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्षा म्हणूनही आपला ठसा उमटविला होता. राष्ट्रीय महिला आयोगाचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या त्या पहिल्या मराठी व्यक्ती ठरल्या आहेत. त्यांना केंद्रीय राज्यमंत्री पदाचा दर्जा असेल. राष्ट्रीय महिला आयोगासारख्या संवैधानिक संस्थेच्या अध्यक्षपदी नियुक्ती केल्याबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. हे काम केवळ महिला सक्षमीकरण एवढ्यापुरतंच मर्यादित न राहता, महिलांच्या नेतृत्वाखाली विकासयात्रेला चालना देण्याचा आपला प्रयत्न राहील असं रहाटकर यांनी म्हटलं आहे.

**बिहार पाहणी**

बिहारमध्ये पुरामुळे झालेल्या नुकसानाची पाहणी करण्यासाठी उच्चस्तरीय आंतरमंत्रालयीन मध्यवर्ती पथक आज पाटण्यात दाखल होत आहे. येत्या मंगळवारपर्यंत हे पथक विविध ठिकाणांची पाहणी करेल तसंच राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांबरोबर बैठका घेईल. गृह मंत्रालयाचे संयुक्त सचिव पार्थसारथी या सात सदस्यांच्या पथकाचं नेतृत्व करणार आहेत. पुरामुळे झालेल्या नुकसानामुळे बिहार सरकारनं केंद्र सरकारकडे तीन हजार 638 कोटी रुपयांची मदत मागितल्याचं बिहारचे आपत्तीव्यवस्थापन विभागाचे मंत्री संतोषकुमार सुमन यांनी म्हटलं आहे.

**राजपत्र**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठानं विकसित केलेल्या पाच पिकांच्या वाणाचा समावेश भारताच्या राजपत्रात करण्यात आला आहे. याबाबत 8 ऑक्टोबरला कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं अधिसूचना प्रकाशित केली आहे. यामुळं या वाणांचा प्रचार आणि प्रसार मोठया प्रमाणावर होण्यास मदत होईल असं विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर इन्द्र मणि यांनी सांगितलं. हे वाण विकसित करण्यात योगदान देणाऱ्या सर्व शास्त्रज्ञांचं कुलगुरूंनी अभिनंदन केलं.

**हॉकी भारत**

हॉकीमध्ये भारताच्या कनिष्ठ पुरुषांच्या संघानं जोहोर सुलतान 2024 विश्वकरंडक स्पर्धेत जपानच्या संघाचा 4-2  असा पराभव केला. मलेशियातील तमन दाया हॉकी मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे. आमीर अली, गुरज्योतसिंग, आनंद सौरभ कुशवाहा आणि अंकित पाल यांनी भारतासाठी गोल केले. हॉकीपटू पी. आर. श्रीजेश या संघाचा प्रशिक्षक म्हणून नवीन कारकीर्द सुरू करत आहे. भारतीय संघाचा सामना आज दुपारी ब्रिटनच्या संघाशी होणार आहे.

**महिला-T20**

महिलांच्या T20 क्रिकेट विश्वकरंडक स्पर्धेत आज दुबई इथं न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका विजेतेपदासाठी लढणार आहेत. 2016 नंतर प्रथमच या स्पर्धेचा नवीन विजेता असेल. संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरू होणार आहे.

**क्रिकेट**

बंगळुरु इथं सुरू असलेल्या कसोटी क्रिकेट सामन्यात न्यूझिलंड आज दुसऱ्या डावाची सुरुवात करणार आहे. एमए चिदंबरम मैदानावर सुरू असलेल्या या सामन्यात न्यूझिलंडला जिंकण्यासाठी केवळ 107 धावांची गरज आहे. कसोटीच्या कालच्या चौथ्या दिवशी भारतानं दुसऱ्या डावात 462 धावा केल्या. सरफराज खानची शतकी खेळी आणि ऋषभ पंतच्या केवळ एका धावेनं हुकलेल्या शतकाच्या जोरावर भारताला ही धावसंख्या उभारता आली. त्याआधी न्यूझीलंडनं 402 धावा केल्या होत्या. भारतानं न्यूझीलंडसमोर विजयासाठी 107 धावांचं आव्हान ठेवलं आहे. जागतिक कसोटी क्रमवारीत भारत सध्या अग्रस्थानी आहे, तर न्यूझिलंड सहाव्या स्थानावर आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**